# CSR (Corporate Social Responsibility)

(पुणे शहरातील रस्तादुभाजक / वाहतूक बेट/ उद्यान सुशोभिकरण करण्यात येणारे प्रायोजकांची जबाबदारी)

- ## संधी

१) रस्ता दुभाजक/ वाहतूक बेट/उद्याने हे सुशोभिकरण करणेसाठी आराखडा तयार करणे. लॅन्डस्केप आणि हॉर्टीकल्चर विषयक प्लॅन तयार करून रस्ता दुभाजक/ वाहतूक बेट/ उद्याने यांचे सुशोभिकरण करून पुणे शहराचे सौदर्यात भर टाकणे.
२) स्थापत्य/ विद्युत तसेच उद्यान विषयक बाबींमध्ये सुधारणा करून रस्ता दुभाजक/ वाहतूक बेट/ उद्याने यांचे नुतनीकरण करणे.
३) देखरेख, देखभाल व दुरुस्तीकरिता होणारा खर्च प्रायोजकाने करावयाचा आहे.
४) करारनामा संपेपर्यंत रस्ता दुभाजक/ वाहतूक बेट/ उद्याने यांची देखभाल करण्याची सर्व जबाबदारी प्रायोजकांची राहील.
५) ठराविक आकाराचे ठराविक अंतरावर जाहिरात फलक लावण्याचे अधिकार प्रायोजकांना देणेत यतील.
६) करारनामा संपुष्टात आलेनंतर विकसित करणेत आलेले रस्ता दुभाजक/ वाहतूक बेट/ उद्याने/वृक्षारोपण पुणे महानगरपालिकेला सुपूर्त करण्यात येतील.

- ## पात्रता

१) अर्जदार/ प्रायोजकांची कमीत कमी र. रु. १ करोड इतकी निव्वळ मालमत्ता असावी.
२) प्रायोजकास रस्ता दुभाजक/ वाहतूक बेट/ उद्याने हे सुभोभिकरण आराखडा तयार करणे, लॅन्डस्केप आणि हॉर्टीकल्चर विषयक प्लॅन तयार करणे अशा गोष्टींचा अनुभव आवश्यक आहे. तसेच देखरेख, देखभाल व दुरुस्तीचा अनुभव आवश्यक आहे.
३) प्रस्ताव सादर करणेकरिता येणारा सर्व खर्च प्रायोजकाने करावयाचा आहे.

- ## अटी व शर्ती

१) स्थापत्य / विद्युत तसेच उद्यान विषयक देखरेख, देखभाल व दुरुस्तीकरिता होणारा खर्च प्रायोजकाने करावयाचा आहे.
२) सुरुवातीस रस्ता दुभाजक/ वाहतूक बेटाकरीता ३ महिन्यांचा, उद्यानांसाठी ६ महिन्यांचा विकसन कालावधी सोडून ५ वर्षाकरिता करारनामा तत्वांवर देखरेख, देखभाल व दुरुस्ती करिता देणेत येईल.
३) यशस्वी प्रायोजकाने ''मा. महापालिका आयुक्त, पुणे मनपा'' यांचे नावे सुरक्षा अनामत रक्कम डी डी/पे ऑर्डर/ चेक द्वारे भरावी.

| | | |
|---|---|---|
| अ. वाहतूक बेट | -- | प्रत्येक ५० चौ. मी. क्षेत्रास र. रु. ५०,०००/- |
| ब. रस्तादुभाजक | -- | प्रत्येक ५०० मी. लांबीस र. रु २५,०००/- |
| क. उद्याने | -- | प्रत्येक १००० चौ. मी. क्षेत्रास र. रु १,००,०००/- |
| ड. वृक्षारोपण | -- | प्रति वृक्ष र. रु ५००/- (वृक्षसंरक्षक पिंजर्यासह)<br>प्रति चौ. मी. क्षेत्रास र. रु ५००/- (वृक्षारोपणासह सुशोभिकरण) |
| इ. मोठ्या कुंड्या | -- | प्रति कुंडी र. रु. २५०/- |

४) रस्ता दुभाजक/ वाहतूक बेट/ उद्याने यांचे स्थापत्य/विद्युत तसेच उद्यान विषयक

प्रस्तावाच्या आराखड्यास उद्यान विभागाची मंजुरी घेणे आवश्यक असून त्यावर उद्यान विभागाचे नियंत्रण राहील.

५) प्रायोजकाने रस्ता दुभाजकउद्यान /वाहतूक बेट / यांची वेळोवेळी साफसफाई करणे, गवत काढणे, पाणी देणे, झाडांची छाटणी करणे, खत देणे, किटकनाशके फवारणी करणे इ. प्रकारे सुशोभिकरण करणे क्रमप्राप्त आहेत.

६) रस्ता दुभाजक /वाहतूक बेटास पाणी देताना रहदारीस अडथळा होणार नाही याची खबरदारी प्रायोजकाने घेणेत यावी. तसेच झाडांना/ रोपांना पाणी दिल्याने काही दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

७) प्रायोजकाने रस्ता दुभाजकउद्यान /वाहतूक बेट / यासाठी अनुभवी सेवकवर्ग नेमावा.

८) रस्ता दुभाजकवाहतूक बे /टे या मधील विद्युत केबल्स, टेलिफोन केबल्स, पाण्याची पाईप लाईन अथवा ड्रेनेज पाईप लाईन यांचे नुकसान झाल्यास ते दुरुस्ती करणेचे जबाबदारी प्रायोजकावर राहील.

९) रस्ता दुभाजकवाहतूक बेट / या मध्ये कोणीही राडारोडा, कचरा टाकणार नाही याची जबाबदारी सदर प्रायोजकाची राहील.

१०) रस्ता दुभाजक उद्याने /वाहतूक बेट /विकसित करणेकरिता येणारा खर्च (लाईट बिल, पाणी बिल, सुरक्षारक्षकांचे वेतन व इतर) प्रायोजाकाने करावयाचा आहे.

११) प्रायोजकाने उद्याना करिता लागणारे पाणी व विजेकरिता लाईट मीटर, पाणी कनेक्शन स्वत : चे नावे असावे.

१२) रस्ता दुभाजकउद्याने /वाहतूक बेट // वृक्षारोपण यामध्ये प्रशासकीय कारणास्तव अथवा वाहतुकीच्या दृष्टीने बदल करावयाचे असल्यास प्रायोजका समवेत केलेला करार आपोआप रद्द होईल तसेच त्या बदल्यात सदर प्रायोजकास कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

१३) रस्ता दुभाजकवाहतूक बे /टा मधील झुडूपाची छाटणी करणाऱ्या मजुराच्या सुरक्षेकरिता लागणाऱ्या सोयीसुविधा पुरवाव्यात. (सेफ्टीगार्ड पुरवावे)

१४) प्रायोजकाने कर्मचार्यांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तसेच प्रायोजकाच्या साधन सामुग्रीची जबाबदारी त्यांचीच राहील.

१५) हॉर्टीकल्चर सुपरवायझर/ हॉर्टीकल्चर मिस्त्री यांनी दरमहा प्रायोजकांस दिलेल्या रस्ता दुभाजकउद्याने /वाहतूक बेट / यांची करावयाची असून त्याबाबतचा अहवाल सहा. उद्यान अधिक्षक यांचे मार्फत मा. मुख्य उद्यान अधिक्षक यांना सादर करावयाचा आहे. दर ३ महिन्यांनी रस्ता दुभाजकउद्यान /वाहतूक बेट / या संबंधीचा अहवाल मा. अति. महापालिका आयुक्त (इ), पुणे मनपा यांचेकडे सादर करावयाचा आहे.

१६) १ वर्षाच्या कालावधीनंतर प्रायोजकाने रस्ता दुभाजक उद्याने /वाहतूक बेट /यांची देखभाल करावयाची नसल्यास सदर बाबत ३ महिने अगोदर पूर्वसूचना देणे गरजेचे आहे.

१७) रस्ता दुभाजक/ वाहतूक बेट / उद्याने / यांचा करारनामा संपल्यावर प्रायोजकाचा जागा, वृक्ष, जाहिरातफलक यावर कोणताही हक्क राहणार नाही.

१८) सदरच्या योजनेअंतर्गत प्रायोजकांकडे रस्ता दुभाजक /वाहतूक बेट /वृक्षारोपण व उद्याने यांची पूर्ण देखभाल, देखरेख व दुरुस्ती इ कामे करून घेण्यात येणार आहे. त्याबद्दल प्रायोजकास त्यांच्या नावाचा नामफलक लावण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

- **अटी शर्ती – रस्ता दुभाजक / वाहतूक बेटे**

**प्रायोजकास खालील प्रमाणे नामफलक लावणेस परवानगी देणेत येत आहे.**

१. **वाहतूक बेटे** – प्रत्येक ५० चौ. मी. क्षेत्रास १५ ╳ १८ इंच आकाराचा नामफलक

२. **रस्ता दुभाजक** – प्रत्येक १०० मीटर लांबीस १५ ╳ १८ इंच आकाराचा नामफलक

**(प्रायोजकाच्या प्रत्येक ३ नामफलकानंतर उद्यान विभाग, पुणे महानगरपालिकेच्या एक नामफलक व त्यावर पर्यावरणाचा संदेश देणारे वाक्य असणे बंधनकारक असणार आहे.)**

३. झुडुपांची उंची रस्त्याच्या रहदारीस अडथळा करणार नाही, याची खबरदारी घेणे.

४. रस्तादुभाजाक/ वाहतूक बेट येथे रात्रीच्या वेळी रहदारी सुरळीतपणे व्हावी यासाठी लाईट रिफ्लेक्टर बसवावेत.

- **अटी शर्ती – उद्याने**

**प्रायोजकास खालील प्रमाणे नामफलक लावणेस परवानगी देणेत येत आहे.**

१. **उद्यान--**

अ) प्रवेशद्वार ६ x ४ फुट आकाराचा नामफलक (२/३ आकार पुणे मनपासाठी व १/३ आकार प्रायोजकांच्या नावासाठी असणार आहे.)

ब) शौचालय, पाणपोई, खेळणीचा भाग, कारंजे– १५ x १८ इंच प्रत्येकी

क) उद्यानाच्या सीमाभिंतीच्या कुंपणावर बाहेरून दिसणारा प्रत्येकी २५ मीटर लांबीस १५ x १८ इंच आकाराचा नामफलक

ड) बाकडे – ६ x १२ इंच आकाराचा नामफलक

२. उद्यान मधील सेवकाची कोठी, नामफलक, कारंजे व मशीनकरिता लागणाऱ्या विजेचा खर्च प्रायोजकाने करावयाचा आहे.

३. उद्यानामध्ये प्रायोजकाने रेनवॉटर हॉरवेस्टीग प्रकल्प राबवायचा आहे.

४. प्रायोजक उद्यानाची वेळ बदलू शकत नाही. उद्यानाची वेळ उद्यान विभाग, पुणे महानगरपालिकेने ठरविलेल्या नियमाप्रमाणेच असेल.

५. प्रायोजकाने उद्यानाचा वापर व्यवसायिक दृष्ट्या करावयाचा नाही.

- **अटी शर्ती - वृक्षारोपण**

**प्रायोजकास खालील प्रमाणे नामफलक लावणेस परवानगी देणेत येत आहे.**

१. **वृक्षारोपण** – वृक्षसंवर्धन पिंजरे व कुंड्या यावर ८ x ६ इंचाचा नामफलक दोन्ही बाजूस लावण्यात यावा.

२. प्रायोजकाने स्थानिक जातीचे वृक्षलावणे बंधनकारक असून त्यास योग्य प्रकारची खते टाकून पाणी देणे बंधनकारक आहे.

३. नागरिकांमार्फत वृक्षारोपणास हानी पोहचणार नाही, याची खबरदारी घेणे.

**(कंपनीचे लेटरहेडवर प्रस्ताव)**

दि.    /    /२०२१

मा. मुख्य उद्यान अधिक्षक
उद्यान विभाग, छ. संभाजीराजे उद्यान,
जंगली महाराज रस्ता,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर....

विषयः- सी. एस. आर अंतर्गत रस्तादुभाजक/ वाहतूक बेट/ उद्यान सुशोभिकरण करणेबाबत.

१. प्रस्ताव धारकाचे नावः-
२. प्रस्ताव धारकांचे पत्ता, फोन नं, ई - मेल :-
३. कंपनीमार्फत प्रस्ताव दाखल करणारे संबंधित व्यक्तींचे नांव व मोबाईल नंबर :-
४. सी.एस.आर अंतर्गत सुशोभिकरण करणार असलेल्या रस्तादुभाजक/वाहतूक बेट/उद्यानांचे नांवः-
५. सी.एस.आर तत्वावर कामाच्या बदली मोबदल्याचे स्वरूपः-
६. सी.एस.आर अंतर्गत सुशोभिकरण करणार असलेल्या रस्ता दुभाजक/वाहतूक बेट/उद्यानांचे वास्तूविशारद दिलेल्या कामाचा नकाशा मोजमापासहः-
७. सी.एस.आर अंतर्गत रस्तादुभाजक/वाहतूक बेट/ उद्यानांचे सुशोभिकरण करणेसाठी येणारा खर्च

प्रस्ताव धारकाचे नाव, सही व शिक्का

सोबतः- १. प्रस्ताव धारकाचे ओळखपत्र.
२. सुशोभिकरण करणार असलेल्या जागेचा मोजमापासह नकाशा (वास्तूविशारद मार्फत)
३. खर्चाचा तपशील
४. जाहिरात फलक १५'' X १८'' ची फोटो कॉफी (१- कंपनी लोगोसह व १ - उद्यान विभाग, पुणे महानगरपालिका लोगोसह)
५. कामांचे मोबदल्यात स्वरूप तपशील